# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक

**विषय :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना वैयक्तिक लॅपटॉप खरेदीसाठी कर्ज योजना राबविण्याबाबत...

**संदर्भ :** १. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र.वित्त/२०१४-२०१५/८८७ दि. ३१/०५/२०१४
२. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र.वित्त/२०१४-२०१५/९१७ दि. ०३/०६/२०१४
३. वित्त व लेखा विभाग परिपत्रक जा.क्र.वित्त/२०१४-२०१५/९९९ दि. १६/०६/२०१४

या परिपत्रकाव्दारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेतर सेवकांसाठी (वर्ग १ ते ४) वैयक्तिक लॅपटॉप खरेदीसाठी बँक ऑफ बडोदा, सेनापती बापट रस्ता शाखेमार्फत कर्ज योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचप्रमाणे ही कर्ज योजना बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे विद्यापीठ परिसर शाखा या मार्फतसुध्दा राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सेवकांना बँक ऑफ बडोदा किंवा बँक ऑफ महाराष्ट्र पैकी कोणत्याही एका बँकेमार्फत कर्ज योजनेचा लाभ घेता येईल. सेवकांनी आपले अर्ज व कागदपत्रे बँकेकडे सादर करावीत. त्यांनंतर बँकेमार्फत कर्जाची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

सीए विद्या कि. गारगोटे
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७.
जा.क्र. वित्त/२०१४-१५/२३२३
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१४

प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी :

१. मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७
२. मा. शाखाप्रमुख,
सर्व प्रशासकीय शाखा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७

यांना विनंती की, सदरील परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षकेतर सेवकांच्या नजरेस आणावे.